REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 6 | MARCH - 2023

# स्वयंरोजगार करणाऱ्या महिला व्यावसायीकांना निर्माण होणाऱ्या समस्या व आर्थिक समस्याः विशेष संदर्भ चंद्रपूर जिल्हा

डॉ. वासुदेव चौधरी[१] , आशिषकुमार ना. शहारे[२]
[१]मार्गदर्शक, विद्या विकास महाविद्यालय, समुद्रपुर. वर्धा.
[२]संशोधनकर्ता

**सारांश**



स्त्रीचे आर्थिक सक्षमीकरण ही एक अतिशय महत्वाची राष्ट्रीय गरज आहे. वाढते राहणीमान, उंचावलेल्या आर्थिक अपेक्षा, वाढती महागाई, आधुनिक जीवनशैली, भव्य स्वप्न, वैज्ञानिक विकासामुळे उपलब्ध होणाऱ्या साधनांचा वापर, पुरूषांच्या व्यसनाधिनतेमुळे आलेली गरीबी, इत्यादीमुळे आर्थिक गरजा वाढल्या. एकटा कुटुंबप्रमुख बऱ्याचदा त्या गरजा भागवू शकत नाही. शेती व्यवसाय, मत्स्य व्यवसाय, स्वंयरोजगार, अशासकीय नोकरी व इतर संबंधित व्यवसाय हे अनिश्चित, अनियीमत, अल्प उत्पन्न देणारे असल्यामुळे या सर्व व्यवसायांना पूरक व्यवसाय म्हणून आर्थिक समस्या सोडविण्यासाठी, पुरूषांना आर्थिक सहयोग करण्यासाठी महिला गृहउद्योगाकडे वळत आहेत असे चित्र आज दिसून येत आहे. अशा प्रकारे स्त्रीचा स्वयंरोजगार ही एक उज्वल आर्थिक भविष्याची वाटचाल ठरावी यासाठी व्यावसायिक निवड, निर्माण होणाऱ्या समस्या व आर्थिक समस्या ह्यांचे चिकित्सक अध्ययन करण्याच्या दृष्टीने स्वयंरोजगार करणाऱ्या महिला व्यावसायीकांना निर्माण होणाऱ्या समस्या व आर्थिक समस्याः विशेष संदर्भ चंद्रपूर जिल्हा या विषयाची निवड करण्यात आली.

## प्रस्तावना

वर्तमान परिस्थितीत महिलांना स्वयंरोजगारांची विशेष गरज जाणवू लागली आहे. स्वयंरोजगाराला अर्थार्जनाच्या दृष्टीने महत्व आहे. स्वयंरोजगारामुळे त्यांच्यासाठी उद्योगाचे नवे दालन खुले झाले आहे. महिलांच्या अंगी असलेल्या कला गुणांना वाव देणे त्यांच्या जवळ असलेल्या ज्ञानाचा, वेळेचा सद्‌उपयोग करणे, त्यांना आत्मनिर्भर बनविणे आजच्या काळातील स्वयंरोजगाराची गरज आहे.

बहुतके स्त्रीयांना कौटुबिंक समस्या उद्‌भवतात. काही प्रसंग ओढवतात. अशा स्थितीत तीव्रतेने आर्थिक स्वावलंबनाची गरज भासते. यावर उपाय किंवा तोडगा म्हणुन आर्थिक विकासाच्या दिशेने पाऊल उचलणे हे आहे. स्त्रीयांचा आर्थिक विकास साधण्यासाठी विशेष करून समाजातील गरीब, गरजू, उपेक्षित महिलांसाठी 'शासन जिल्हा उद्योग विकास केंद्र' 'महिला आर्थिक विकास महामंडळ' 'खादी ग्रामोउद्योग', 'बचत गट', स्वयंसहाय्य बचत योजना, 'स्वर्ण जयंती ग्रामस्वयंरोजगार योजना', 'सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना' राबवित आहे. स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत आहे. या योजनांच्या मार्गदर्शन, सहकार्याने कौटुबिंक आर्थिक गरजेपोटी स्त्रीया स्वयंरोजगाराकडे प्रवृत्त होत आहेत.

पुर्वी स्वतंत्रपणे स्वयंरोजगार निर्मितीमध्ये महिला सहभागी नव्हत्या. त्या शेतातील व कुटूंबातील कामे करून अप्रत्यक्षरित्या उत्पादनात सहभागी होतात परंतु त्यांच्या श्रमाचा मुल्यांच्या ;चतपबमद्ध संदर्भात विचार करण्यात आलेला नव्हता. आता मात्र गृहिणी उद्योग क्षेत्रात पुढे जाऊ लागल्यामुळे एक उद्योजक म्हणून नवीन वैशिष्टयपूर्ण ओळख समाजाला होऊ लागली.

परंतु स्पर्धेच्या युगात नैतिकमुल्ये ढासळलेली आहेत. स्त्रीचे ज्ञान, आरोग्य धोक्यात आले आहे. आर्थिक विवंचनेपोटी स्त्रीयांना घटस्फोट, आत्महत्या किंवा वाममार्ग पत्करावा लागतो. याऊलट स्त्री कमवती असली की, आर्थिक लाभामुळे कुटुंबाला ती ओझे न वाटता हवीशी वाटते. तिची आर्थिक क्षमता वाढते. आरोग्याची पातळी व राहणीमानाचा दर्जा उंचावतो. तसेच समाजातील कुटुंबाचे स्थानही उंचावते. एकूणच राहणीमान सुधारते. कुटुंबाचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टीकोन उन्नत होतो. परंतु स्त्रीयांना अर्थार्जन करतांना नोकरी असो अथवा स्वयंरोजगार असो. अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. तरीदेखील आपल्या दृढनिश्चियी व लवचिक विचारसरणीच्या मदतीने स्त्री उद्योजक समस्यांवर मात करून पुढे जात आहेत.

वरील माहिती ला केंद्रस्थानी ठेवता, या व्यवसायिकांच्या समस्या जाणून घेणे क्रमप्राप्त ठरते. हेच ध्येय समोर ठेऊन संशोधकाद्वारे खालील शिर्षकांतर्गत अध्ययन करण्याचे ठरविण्यात आले

**सारणी क्रमांक १: चंद्रपूर जिल्हयातील महिला व्यवसायिकांद्वारे करण्यात येत असलेल्या व्यवसायात उद्भवणाऱ्या समस्यांच्या प्रकारासंबंधी माहिती**

| व्यवसायात उद्भवणाऱ्या समस्यांचा प्रकार | वरंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| आर्थिक स्वरूपाच्या समस्या | २०६ | ८६.८ |
| कौटुंबिक सहकार्याचा अभाव | १३८ | ४५.९ |
| मार्गदर्शनाचा अभाव | २३९ | ७९.७ |
| मनुष्यबळाचा अभाव | ८० | २६.८ |
| कच्च्या मालाची अनुप्लब्धता | ७३ | २४.२ |
| शासकीय अधिकाऱ्यांचे असहकार्य | २०३ | ६७.७ |
| अपूरी जागा | १४४ | ४८.१ |
| मजूरीच्या मोबदल्याचे वाढते दर | २४७ | ८२.५ |
| व्यवसायिक स्पर्धेत वाढ | २३१ | ७७.१ |
| विपणनाच्या समस्या | १३८ | ४६.१ |
| ग्राहकांचा अभाव | ११० | ३६.६ |

उपरोक्त सारणी क्रमांक १ मध्ये चंद्रपूर जिल्हयातील महिला व्यवसायिकांद्वारे करण्यात येत असलेल्या व्यवसायात उद्भवणाऱ्या समस्यांच्या प्रकारासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ८६.८ टक्के चंद्रपूर जिल्हयातील महिला व्यावसायिकांना व्यवसायात आर्थिक स्वरूपाच्या समस्या येत असून ८२.५ टक्के महिला व्यावसायिकांना व्यवसायात मजूरीच्या मोबदल्याचे वाढत्या दरांच्या समस्येचा सामना करावा लागतो. तसेच करीत असलेल्या व्यवसायात मार्गदर्शनाचा अभाव, व्यवसायिक स्पर्धेत वाढ व शासकीय अधिकाऱ्यांचे असहकार्य या समस्या नोंदविणाऱ्या चंद्रपूर जिल्हयातील महिला व्यावसायिकांची टक्केवारी क्रमशः ७९.७ टक्के, ७७.१ टक्के व ६७.७ टक्के आहे. त्याचप्रमाणे अपूरी जागा, विपणनाच्या समस्या, कौटुंबिक सहकार्याचा अभाव, ग्राहकांचा अभाव, मनुष्यबळाचा अभाव व कच्च्या मालाची अनुप्लब्धता या समस्यांचा सामना करणाऱ्या चंद्रपूर जिल्हयातील महिला व्यावसायिकांची टक्केवारी अनुक्रमे ४८.१ टक्के, ४६.१ टक्के, ४५.९ टक्के, ३६.६ टक्के, २६.८ टक्के व २४.२ टक्के आहे.

सारणी क्रमांक २: चंद्रपूर जिल्हयातील महिला व्यवसायिकांद्वारे करण्यात येत असलेल्या व्यवसायात उद्भवणाऱ्या समस्यांच्या निवारणा करिता करण्यात आलेल्या उपाययोजनेसंबंधी माहिती

| समस्यांच्या निवारणा करिता करण्यात आलेल्या उपाययोजना | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| व्यवसायात अनुभवी व्यक्तीचे मार्गदर्शन | २०५ | ६८.४ |
| शासकीय संस्था व तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन | १५ | ५.० |
| कुटुंबियांचा सल्ला | १६१ | ५३.५ |
| इतर | ३३ | ११.० |

उपरोक्त सारणी क्रमांक २ मध्ये चंद्रपूर जिल्हयातील महिला व्यवसायिकांद्वारे करण्यात येत असलेल्या व्यवसायात उद्भवणाऱ्या समस्यांच्या निवारणा करिता त्यांच्या द्वारे करण्यात आलेल्या उपाययोजनेसंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ६८.४ टक्के महिला व्यवसायिक व्यवसायात येणाऱ्या समस्या निराकरणा करीता अनुभवी व्यक्तीचे मार्गदर्शन घेत असून ५३.५ टक्के चंद्रपूर जिल्हयातील महिला व्यवसायिक कुटुंबियांचा सल्ला घेतात. व्यवसायिकांद्वारे करण्यात येत असलेल्या व्यवसायात उद्भवणाऱ्या समस्यांच्या निवारणा करिता इतर उपाययोजना करणाऱ्या आणि शासकीय संस्था व तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन घेणाऱ्या चंद्रपूर जिल्हयातील महिला व्यावसायिकांची टक्केवारी अनुक्रमे ११.० टक्के व ५.० टक्के आहे.

## निष्कर्ष

चंद्रपूर जिल्हयातील महिला व्यावसायिकांना व्यवसाय करतांना एका पेक्षा अधिक समस्यांचा सामना करावा लागतो या पैकी बहुतांश महिला व्यावसायिकांना आर्थिक स्वरूपाच्या समस्या, मजूरीच्या मोबदल्याचे वाढत्या दरांच्या समस्या, मार्गदर्शनाचा अभाव, व्यवसायिक स्पर्धेत वाढ व शासकीय अधिकाऱ्यांचे असहकार्य या समस्यांचा सामना करावा लागतो. व्यवसायात उद्भवणाऱ्या समस्यांच्या निवारणा करिता चंद्रपूर जिल्हयातील महिला व्यवसायिकांद्वारे एकापेक्षा अधिक उपाययोजना करण्यात येतात त्यापैकी बहुतांश महिला व्यावसायिक अनुभवी व्यक्तीचे मार्गदर्शन व कुटुंबियांचा सल्ला घेतात.

## संदर्भसूची

१) डॉ. आगलावे प्रदीप संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे विद्या प्रकाशन, चंद्रपूर १ जाने.२०००
२) डॉ.भांडारकर पु.ल. सामाजिक संशोधन पद्धती महाराष्ट्र विद्यापीठ ग्रथनिर्मीत मंडळ, नागपुर. तृतीय आवृत्ती १९८७
३) डॉ.संत दु.का. संशोधन पद्धती, प्रक्रिया व अंतरंग पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन पुणे द्वितीय आवृत्ती जुलै - १९८८
४) डॉ.नाडगोंडे गुरूनाथ सामाजिक संशोधन पद्धती फडके प्रकाशन कोल्हापूर द्वितीय आवृत्ती ऑक्टो.१९९९
५) डॉ. जरारे विजय एल. समाजिक शास्त्रीय संशोधन प्रणाली अद्वैत प्रकाशन, अकोला २२ ऑक्टो.२००४
६) प्रा. घाटोळे रा.ना. समाजशास्त्रीय संशोधन तत्वे आणि पद्धती मंगेश प्रकाशन, चंद्रपूर पाचवी आवृत्ती १९९२
७) डॉ. बोरूडे रा. र. संशोधन पद्धतीशास्त्र पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन सप्टें.२००५
८) कऱ्हाडे बि. एम. "भारतीय समाज प्रश्न आणि समस्या" पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स महाल, चंद्रपूर पृ. क्र. १३६